## SMT KAVERIDEVI KEDARMAL AGRAWAL ARTS & COMMERCE COLLEGE
## MALKAPUR, DIST: BULDHANA

**Department :Marathi**

| Sr. No. | Title Of Paper | Name Of Authors | Department Of Teacher | Name Of Journal | Year Of Publication | ISBN/ISSSN Number | Impact Factor -(SJIF )/Indexing |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रामगीतेतील जीवनमूल्ये विषयक विचारThoughts on the values of life in Gramgeeta | Prof.Anil Arak | Marathi | An International Multidisciplinary Quarterly Research Journal | 2019-2020 | ISSN :2277-5730 | 2019-6-.399 |
| 2 | संत साहित्य(Saint literature) | Prof.Anil Arak | Marathi | VIDYAWARTA Peer-Reviewed International Research Journal | 2019-2020 | ISSN :2319-9318 | 7.041(IIJIF ) |
| 3 | अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्राज्ञानाची उपयुक्तता व महत्व Usefulness and importance of information and technology in learning and teaching process | Prof.Anil Arak | Marathi | International Research Fellow Association's 'RESEARCH JOURNEY' | 2020-2021 | E-ISSN-2348-7143 | 6.625 |
| 4 | मराठी साहित्यातील ग्रामीणकथा एक अभ्यास A study of rural stories in Marathi literature | Prof.Anil Arak | Marathi | International Research Fellow Association's 'RESEARCH JOURNEY' | 2020-2021 | ISBN: 978-81-95551-4-9 | |


Verified & Found Correct


Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm. College, MALKAPUR.
Dist.Buldana.

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA






Volume-IX, Issue-I
January - March - 2020
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR
Dist.Buldana.

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रामगीतेतील जिवनमुल्य<br>**प्रा. नाजुकराम दिनानाथ बनकर** | १-५ |
| २ | वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्राम स्वराज्यांसंबंधी विचार<br>**प्रा. डॉ. उमेश आर. धुमाळे** | ६-८ |
| ३ | खंजेरीच्या नादातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाजप्रबोधन<br>**प्रा. अमोल वासुदेवराव गावंडे** | ९-११ |
| ४ | राष्ट्रसंताच्या मते सांगीतीक भजनाद्वारे समाजजागृती<br>**डॉ. स्नेहल दत्तात्रय शेंबेकर** | १२-१४ |
| ५ | राष्ट्रसंतांचे स्त्री सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**प्रा. मंगला डि. बनसोड** | १५-१९ |
| ६ | २१ व्या शतकात राष्ट्रसंतांच्या साहित्याचे महत्व<br>**डॉ. सी. डी. पाखरे** | २०-२३ |
| ७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील आणि अभंगातील तत्त्वविचार<br>**प्रा. डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे** | २४-२६ |
| ८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सांगीतीक योगदानातील सामाजिक तत्व<br>**प्रा. नाना विठ्ठलराव भडके** | २७-२८ |
| ९ | राष्ट्रसंताचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. प्रशांत एस. पगाडे** | २९-३३ |
| १० | राष्ट्रसंत गाडगे महाराज : सामाजिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. शिवाजीराव पाटील** | ३४-३८ |
| ११ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मानवतावाद<br>**प्रा. डॉ. शोभा रोकडे** | ३९-४२ |
| १२ | राष्ट्रसंताचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. राहुल एम. भोरे** | ४३-४५ |
| १३ | ग्रामगीता : राष्ट्राच्या विकासाचा जाहिरनामा<br>**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम** | ४६- |





Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | ग्रामगीतेतील उद्योगशिलता<br>**प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर** | ४८-५३ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्वप्नातील भारताची जडणघडण<br>**प्रा. डॉ. सुभाष एस. पवार** | ५४-५९ |
| १६ | ग्रामगिता आणि महिलोन्नती<br>**प्रा. डॉ. सौ. सोनाली राजेश बन्सोड** | ६०-६३ |
| १७ | राष्ट्रसंतांचे महिला सक्षमीकरणविषयक विचार<br>**डॉ. सुनिता मनवर** | ६४-६७ |
| १८ | राष्ट्रसंताचे ग्रंथाध्ययन विषयक विचार<br>**प्रा. डॉ. विलास खुणे** | ६८-७१ |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन माणिक बंडूजी ब्रम्हभट्ट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - एक जीवनप्रवास<br>**प्रा. डॉ. कु. वैशाली भिवसेन भिसे** | ७२-७६ |
| २० | राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>**प्रा. वर्षा सुनील आगरकर** | ७७-७९ |
| २१ | ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचार<br>**प्रा. अनिल शिवाजी आराक** | ८०-८५ |
| २२ | राष्ट्रसंतांच्या समाज प्रबोधनामध्ये संगीताची भूमिका<br>**प्रशांत राजवर्धन** | ८६-८९ |
| २३ | ग्रामगितेतील उद्योगशीलता<br>**सौ. प्रांजली योगेश बारस्कर** | ९०-९६ |
| २४ | समाजाचा महामेरु : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज<br>**डॉ. अमोल र. बोरकर** | ९७-१०० |
| २५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील जीवन मूल्ये !<br>**डॉ. सिद्धार्थ बुटले** | १०१-१०४ |
| २६ | राष्ट्रसंताची भजने, अभंग आणि समाज प्रबोधन<br>**सीमा देशपांडे** | १०५-१०८ |


Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक चिंतन<br>**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके** | १०९-११२ |
| २८ | राष्ट्रसंतांची अभंग गाथा-समाजोध्दाराची सरिता<br>**प्रा. डॉ. कल्पना मेहरे** | ११३-११५ |
| २९ | माणिक बंडुजी ब्रम्हभट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : एक जीवन प्रवास<br>**डॉ. मेघा गोपाळराव सबाने** | ११६-१२० |
| ३० | राष्ट्रसंतांची स्त्री - सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**डॉ. मंदा विठोबाजी तडस** | १२१-१२५ |
| ३१ | राष्ट्रसंतांना अभिप्रेत असणारा माणूस<br>**डॉ. सतीश माधवराव चहांदे** | १२६-१३२ |
| ३२ | वंदनिय राष्ट्रसंतांच्या स्वप्नांतील भारताची जडण घडण<br>**प्रा. डॉ. अनिता ज. तिडके** | १३३-१३६ |
| ३३ | राष्ट्रसंतांचे युवकांना आवाहन<br>**प्रा. डॉ. केशव सितराम गोरे** | १३७-१३९ |
| ३४ | ग्रामगीतेतील जीवनमूल्ये विषयक विचार<br>**डॉ. अशोक गौरीशंकर माळगे** | १४०-१४५ |
| ३५ | ग्रामगीता तेथे सुबत्ता<br>**प्रा. डॉ. महेश सखाराम बावधनकर** | १४६-१५० |
| ३६ | वंदनीय राष्ट्रसंतानी स्त्रीशक्तीचा घेतलेला शोध व बोध<br>**प्रा. कु. पूजा विनायकराव जोशी** | १५१-१५५ |
| ३७ | महिलांच्या उन्नती विषयी राष्ट्रसंताचे विचार<br>**डॉ. अनुराधा रा. मुळे** | १५६-१५८ |


Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २१. ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचार

**प्रा. अनिल शिवाजी आराक**
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती के. के. अग्रवाल कला - वाणिज्य महा. मलकापूर.

**प्रस्तावना**

माणिकदेव बंडोजी इंगळे/राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म 30 एप्रिल 1909 रोजी यावली जि. अमरावती येथे झाला. त्यांनी ग्रामगीता हा ज्ञानेश्वरीच्या तोडीचा ग्रंथ लिहला. ग्रामगीतेतील 41 अध्यायात आठ पंचके असून त्यामध्ये जीवनाच्या पुनर्घटनेचा प्रपंच सर्व तपशिलात शिरून केलेला दिसून येतो. ग्रामगीतेतील जीवनमुल्यविषयक विचार मांडत असतांना मुल्य म्हणजे काय हे जाणून घ्यावे लागेल..

मानवी जीवनामध्ये मुल्यांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. मुल्याबाबतची विचारसरणी निर्माण करणे आवश्यक आहे. मुल्य स्वंयसिध्द असल्यामुळे व्यक्तीला सहजपणे साध्य करता येतात. प्रत्येक समाजाचे त्याचप्रमाणे त्या समाजातील व्यक्तीचे काही आदर्श ध्येये व उद्दिष्टे असतात. त्यांना त्या समाजाची वा व्यक्तीची मुल्ये असे म्हणतात. सर्व लोकांच्या सहजप्रवृत्तीमध्ये चांगले वळण लावून घेण्याची पात्रता असते. सहज प्रवृत्तीवर संस्कार करण्यासाठी कौशल्य अपेक्षित आहे. योग्य अशा कामामध्ये माणसाला कुशल होऊ दया मग तो सदगुणी होऊ शकेल. इच्छाशक्ती प्रबळ असल्यास सामर्थ्यसंपादन परिणामकारक रितीने होऊ शकते. म्हणजे आपल्या इष्ट कार्यामध्ये जितक्या अडचणी अधिक तितके ते कार्य आपल्याला अधिक आवडते म्हणजे मुल्यांच्या निकोप वाढीसाठी स्वंयसिध्द आणि इष्ट ध्येये अपेक्षित असतात.

**उद्येश**

१. ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचारांचा आढावा घेणे.
२. ग्रामगीतेतील जीवनमुल्ये विषयक विचारांचा अभ्यास करणे.
३. ग्रामगीतेतील जीवनमूल्याचे महत्व समजून घेणे.

**ग्रामगीतेतील जीवनमुल्ये**

**1) श्रम प्रतिष्ठा**

कुठलेही शारीरिक कष्टाचे काम हलके, कमी महत्वाचे न मानता ते हौसेने मनापासून करणे, असे काम करणाऱ्या श्रमिकांबद्दल आदर बाळगणे, त्यांचा मान राखणे व त्यांच्या कामात सहभागी होणे हे श्रमांचे महत्व तुकडोजी महाराज यांनी जाणलं होत ते म्हणतात.

तेचि माणुसकीचे कर्म। जे दुसऱ्यासाठी केले श्रम।
एरव्ही पशुपक्षीहि करिती उद्दम। आपुलाले।।

मानवांनी स्वतः श्रम करावेच पण दुसऱ्यांसाठीही थोडे फार कष्ट वेचले पाहिजे. एव्हाना पशुपक्षीही त्यांच काम नित्यनेमाने करतच असतात. जर मानसामधील माणुसकी जिवंत असेल तर नक्कीच तो दुसऱ्याही व्यक्तीला

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm. College, MALKAPUR.

मदत करेल. कष्ट नित्यनेमाने करणे आवश्यक आहे नाहीतर समाजाची घडी विस्कटल्यावाचून राहणार नाही. मंदिरात बसून नाक दाबण्यापेक्षा मार्गातील काटी उचलणे. दुःखी दिनदुबळ्यांवर दया करणे. हे तीर्थस्थानावून श्रेष्ठ आहे. महाराज म्हणतात श्रमनिष्ठेचा प्रचार करावा. सर्वांना आपुलकी वाटेल अशी सुंदर व्यवस्था निर्माण करावी. व गावाचे उत्पादन वाढवावे. उद्योग, यंत्रे हे देशातच निर्माण करावी. आपणच त्याचा वापर करून वैभव निर्माण करावे. प्रत्येक घरात जोडधंदा असावा. नानाप्रकारचे व्यवसाय उभे करावे, कोणी पिशव्या तयार कराव्या, चपला, चटया, आसने, खुर्च्या, खेळणे, बादल्या, पलंग, साबण, मडके, कुंड्या, फुलपात्रे, वीट, बैलांचा साज अशा अनेक वस्तु तयार कराव्या.

ऐसी असावी कलाकुसरी। उद्योगधंदे घरोघरी
जराहि न दिसेल बेकारी। वाढली कोठे।।

अशाप्रकारे श्रमप्रतिष्ठा हे मुल्य समाजात रूजवले जावे.

**2. वैज्ञानिक दृष्टीकोन**

आपल्या आसपास घडणाऱ्या गोष्टीचा तर्कसंगत कार्यकारणभाव मांडणे आणि त्यानुसार योग्य कृती करणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टीकोन. महाराज म्हणतात.

असो  कोणाही धर्माची खूण । परि मूर्ति मानवांनी केली निर्माण।
तिथे कोठले देवपण । तिचे पूजन कशाला ।।

संत तुकडोजी महाराजांनी मूर्तिपूजेला विरोध केलेला दिसुन येतो जर मानवाने ती घडवीली असेल किंवा निर्माण केली असेल तर त्यामध्ये कोणते देवपण आहे. तिचे पुजन कशासाठी असे प्रश्न महाराजांना पडतात. देवाला कर्मकांड अपेक्षीत नसुन शुध्द प्रेम हवे आहे. उपासकाविषयी मत मांडतांना ते म्हणतात. की देवाच्या मुर्तीसाठी तो सोने, हीरे, देवू करतो पण एखाद्या गरिबाला तो मदत करणार नाही.

चमत्काराच्या भरी भरोनि । झाली अनेकांची धुळधाणी ।
संत – चमत्कार या पुढे कोणी। नका वर्णु सज्जन हो।

चमत्कारांच्या भानगडीत पडुन अनेकांचे संसार उध्वस्त झाले. संत चमत्कार करत नव्हते. ना करतात या भलत्याच भ्रमात सज्जनांनी पडु नये.

ही बुवाबाजी भुलवी जना । भ्रष्ट करी ग्रामजीवना ।
फसवोनि भोळ्या बापड्यांना । भलत्या छंदा लावतो.।।

भोळ्या – बापड्या लोकांनी बुवाबाजीच्या नांदी लागू नये असे महाराज म्हणतात. अज्ञानी लोक लवकर फसतात म्हणून त्यांना शिक्षण उपलब्ध करूण देणे महत्त्वाचे आहे.

**3) स्त्री–पुरूष समानता**

सर्व मानवजात एक आहे. स्त्री आणि पुरूष हे समान दर्जाचे आहेत. त्यांच्यात श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद होउ शकत नाही जीवनात व्यक्तिगत विकासाकरीता समान संधी , समान हक्क आणि अधिकार व्यक्तीस मिळाला पाहिजे. महाराज म्हणतात.

विद्यागुरूहूनि थोर। आदर्श मातेचे उपकार।

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm. College, MALKAPUR
Dist.Buldana.

गर्भापासोनि तीचे संस्कार । बालकांवरि।।

मुलांवर संस्कार, त्याला योग्य वळण देण्याचे काम एक स्त्रीच करते. म्हणून स्त्री आणि पुरूष असा भेद न करता स्त्री–पुरूष समानता असावी म्हणुन महाराज पुढील ओव्यातुन म्हणतात.

समाजी जो पुरूषासि आदर । तैसासि महिलांशी असावा व्यवहार

किंबहुना अधिक त्यांचा विचार । झाला पाहिजे समाजी ।।

महिलांना पुरूषापेक्षा जास्त सधि मीळायला हवी त्यांना उच्चशिक्षण उपलब्ध करून दिले जावे असा उदात्त हेतु महाराजांचा होता.

मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे । तैसेचि मुलींनाही शिकवावे ।

हेळसांड करू नये हे जाणावे । समाजाने ।।

ज्या प्रकारे मुलास शिक्षणाच्या किंवा इतर सुविधा दिल्या जातात तसाच विचार मुलींच्या बाबतीतही व्हावा. त्यांची हेडसांड टाळावी.

म्हणोनी रथाची दोन्ही चाके। मजबुत करावी कातोनि सारखे

तरिच संसारगाडी सुखे। सुखावेल ग्रामजीवनाची ।।

रथाच्या चाकासारखा संसाराचा गाडा चालण्यासाठी स्त्री – पुरुष या दोघांनाही सारखेच महत्व आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

**4) सर्वधर्म सहिष्णूता**

प्रत्येकाला आपल्या धर्माविषयी आस्था आपुलकी वाटते. धर्मातील शिकविणीविषयी त्यांच्या मनात आदरभाव असतो. आपल्या धर्माच्या लोकांविशयी आपलेपण असतो. या सर्व भावभावनांविषयी – अन्य धर्मीयांच्या बाबतीतही बाळगणे आणि समाजात वावरतांना त्या उक्ती – कृतीतून व्यक्त करणे.सर्वधर्म सहिष्णूता या विषयी महाराज म्हणतात.

मग ह्या कोणत्याही ग्रंथाचे वचन। परि वर्म याहुनि नाही भिन्न

मानवता हीच आहे खुण। सर्वधर्मसमन्वयाची ।।

ज्या धर्माने मानवता सांगीतली आहे त्या धर्माचे एकच तत्व आहे.

विष्णुमय जग हाच स्वधर्म। ऐसे संती कथले वर्म।

तरीहि आमुचा न जाय भेदभ्रम । अमंगळ ऐसा ।।

स्वधर्म म्हणजेच मानवधर्म मानसांनी मानव्याचा गौरव वाढवला पाहिजे. आपसात असणारे भेदभाव हे अमंगळ असून ते मनातुन हद्दपार केले पाहिजे.

**5) वक्तशीरपणा**

वेळेचे महत्व जाणणे, कोणतेही काम वेळेवर करणे, वेळ सांभाळण्यासाठी आटोकाट प्रयत्न करून परिस्थितीवर मात करणे आणि वेळेचा काटेकोर उपयोगाने स्वतःच्या, इतरांच्या व परिवाराच्या जीवनात सुसंवाद साधणे

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

वक्तशिरपणा या मुल्याविषयी तुकडोजी महाराज म्हणतात.

व्यक्ति व्हाया आदर्श सम्यक। पाहिजे दिनचर्याच सात्विक

सारे जीवन निरोगी सुरेश। तरीच होईल गावाचे।।

वेळेचं महत्त्व, महाराजांनी जाणलं होते. म्हणुन सकाळी लवकर उठणे, कामाचे नियोजन करणे. त्यानुसार कृती करणे यामुळे सारे जीवन सुखी होते. हा विश्वास महाराजांना होता.

राखावी शब्दांची किंमत। वेळेचे महत्व सदादित।

दुसऱ्याचे सुख–दुःख आघात–हित। आपणा इतुकेची जाणावे।।

**6) नीटनेटकेपणा**

व्यक्तीचे व्यक्तीगत पातळीवरील, कौटुंबिक पातळीवरील, सामाजिक पातळीवरील सुयोग्य वर्तन, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेबाबतच्या सवयी आणि वस्तुंचा वापर त्यांची निगा व सार्वजनिक सुविधाचा जागरूक तेने वापर या विषयी योग्य कृती करणे

असभ्य, हेकट नसावे वर्तन। कर्कशता न दिसावी वागण्यातुन

कुणाचीही निंदा, स्तुती ऐकोन। दुराग्रही मन न करावे।।

महाराज म्हणतात वर्तन, वागण्याच्या बाबतीत हेकटपणा नसावा. आचरण नेहमी चांगले शुध्द असावे कुणाचीही निंदा करू नये व स्तुती ऐकुन त्याची टिंगलटवाळी करू नये.

तो राहतो नीटनेटका। वाया न धाडी आपुला पैका ।

सर्वां सांभाळितो सरखा। आपुल्यापरी।।

स्वतः स्वच्छ राहतो इतरांची ही काळजी घेतो हे वर्तन महाराजांना अपेक्षित होते.

**7) सौजन्यशीलता**

आपल्या आचार–विचारातून, बोलण्यातुन इतरांच्या बद्दलचा आदरभाव, सद्भाव व्यक्त करणे आणि कुणालाही न दुखावता व्यवहार करणे.

सौजल्यशीलता या मुल्याविषयी महाराज म्हणतात

लोकांशी बोलणे शिकवावे। तरि आपण उत्तमाची बोलावे।

बोलण्यात माधुर्य ओतावे। आपुल्या प्रेमे

आपल्या बोलण्यातुन, दुःसऱ्याचं मन दुखंणार नाही. याची काळजी घेतली जावी. व समोरच्या भक्तीचा आदर केला जावा. ही अपेक्षा या मुल्यात जाणवते.

आपुले बोलणे प्रेमाचे। दुसऱ्याचे बोलणे कोधाचे

परि ते सहन करावे त्याचे। वार अंगी।

कोणि कसाही वागत असला तरि आपण त्याच्याशी चांगला व्यवहार करावा.

Verified & Found Correct

Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

**8) समता**

जन्मामुळे व्यक्तीला श्रेष्ठत्व देणे एका विशिष्ट वर्णातील व जातीतल व्यक्ती श्रेष्ठ व इतर कनिष्ठ असे विषमतावादी तत्वज्ञान तुकडोजी महाराज यांना मान्य नव्हते.

मग तो असो कोणत्या जातीचा। पंथाचा वा धर्म,जमातीचा।

तो खरा स्वधर्मी सखाचि आमुचा। मानू आम्ही।।

समता निर्माण करण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले आहे त्यांचे महाराजांकडुन कौतूकच झाले मग तो कोणत्याही जातीचा असणे हा गौण प्रश्न होता.

कृष्ण म्हणे समंहि ब्रम्ह। समता हाचि ईश्वरी धर्म।

समदर्शी तोचि पंडित उत्तम। योगाचे मर्म समत्वचि।।

श्रीकृष्णाने सुध्दा गीतेतुन हाच समतेचा संदेश दिला असं महाराज म्हणतात.

**9) न्याय**

न्याय ही मानवी संकल्पना असल्यामुळे ती गतिमान आहे. न्यायाची कल्पना भिन्नभिन्न समाजात वेगळी असते तसेच कलानुसार तिच्यात बदल होतात. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत न्याया विषयी मत मांडतांना सांगीतले की कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्यास त्रास देवू नये, फसवू नये दुरावू नये सर्वांना आपले मानावे.

पाहाव्या त्यांच्या सुखसोयी। वागणुक सर्वांशी ठेवावी न्यायी।

भेदभाव समूळ जाई। जीवन ऐसे निर्मावे।।

कोणत्याही प्रकारे समाजामध्ये भेदभाव न करता सर्वांप्रती न्यायाची भुमीका घेतली जावी अश्या वागण्याने इतरांच्या मनात आदर भाव निर्माण होईल व लोक सदभावनेने वागतील.

**10) बंधुता**

बंधुता म्हणजे मानवी भातृभाव ... त्याचेच दुसरे नाव आहे नीतिमत्ता तुकडोजी महाराजांनी समाजात बंधुभाव नोंदण्यासाठी अनेक महापुरुषाच्या कार्याचा उल्लेख ग्रामगीतेत केलेला दिसून येतो जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी बंधुता महत्वाची आहे महाराज म्हणतात.

जगी नांदावी सुखशांती। सर्वांनी आचरावी बंधुप्रिती।

यासनिच झटले असती। महापूरूष अभेदत्वे।।

तरि त्यासि तुम्ही अव्हेरावा। हे म्हणणे नाही पसंत जीवा।।

तो आपुलाचि म्हणोनि राखावा। बंधुसखा।।

प्रत्येकासोबत बंधुभावाने वागणे प्रत्येक धर्म, पंथाचा आदर करणे हेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अपेक्षित होत.

**सारांश**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहलेल्या ग्राम गीतेमध्ये अनेक मुल्यांचा उल्लेख झालेला दिसून येतो सशक्त समाजनिर्मितीसाठी ग्रामगीतेतील जीवन मुल्ये उपयोगी असून ही जीवनमुल्ये प्रत्येक्ष कृतीत आचरणात आणणे महत्वाचे आहे. ग्रामगीता प्रत्येक व्यक्तीने एकदा जरूर अभ्यासली पाहिजे. ग्रामगीतेचे अध्ययन केल्यावर दिसून येते

Verified & Found Correct



Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR
Dist. Buldana

की आपल्या लोक समाजाची परंपरागत धर्मदृष्टी आणि आधुनिक लोकशाहीचे नवे तत्वज्ञान या दोहाचा मेळ महाराजांनी मोठ्या कौशल्याने घातलेला आहे. गांव व शहर हे एकमेकांना शोषक व शासक न होता पुरक व पोषक व्हावेत. सर्व स्तरातील जनता सुखी समाधानी व्हावी हेच महाराजांना हवं होत. अंधश्रध्दा निर्मूलन तंटामूक्ती, व्यसनमुक्ती, भ्रष्टाचारमुक्त गांव या सर्व गोष्टीचे प्रबोधन महाराजांनी ग्रामगीतेत केले आहे. उल्लेख ग्रामगीतेत दिसून येतो. ग्रामगीतेच्या अध्ययनावरून दिसून येते की, महाराज हे दूरदृष्टीचे संत होते. म्हणून राष्ट्रसंत ही उपाधी त्यांना अगदी सार्थ ठरते.

**संदर्भ ग्रंथ**

१. बोरकर विष्णू :– मुल्यशिक्षणाची गुरूकिल्ली, गाज प्रकाशन अहमदनगर. आत्मानुसंधान, भुवैकुंठ प्रकाशन चंद्रपुर

२. संपादक सुदामजी सावरकर :– ग्रामगीता, श्रीगुरूदेव

३. संपादक डॉ. सुभाष सावरकर :– राष्ट्रसंत तुकडोजीः जीवन व कार्य

४. प्रा. रघुनाथ कडवे :– मानवतेचे पुजारीः राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

Verified & Found Correct

Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

## CONTACT FOR SUBSCRIPTION

**AJANTA ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**

**Vinay S. Hatole**

**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**

**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**

**E-mail : ajanta5050@gmail.com Website : www.ajantaprakashan.com**

Verified & Found Correct

Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

VIDYAWARTA®
Peer Reviewed International Refereed Research Journal

Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne
Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affilliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)

Special Issue
February- 2020
(Vol- II)

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana

• Organizes •

One Day Inter Disciplinary National Conference on

# HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

# INDEX

01) Impact of English language on Indian society in post colonial period.
**DR. Abhay M. Patil, Dist. Buldhana** ||15

02) RIGHT TO PRIVACY IS AS AN INTRINSIC PART OF LIFE: DEVELOP CASE BY CASE ...
**Adv. Chandani Vishwasrao Ghogare, Osmanabad** ||18

03) Angela Carter and feminist Ideology
**Prof. Ajay Abhyankar, Kurha** ||25

04) Voice of the Chicanos in Literature: Chicano as Other Subaltern
**Asst. Prof. A. M. Shekh, Mangrulpir** ||28

05) Knowledge Management in Academic Libraries
**Dr. Dattatray R. Dhumale, Dist .Buldhana** ||30

06) Significant Role Of Kabaddi In Sports Culture
**Dr. Anil A. Deshmukh, Amravati** ||33

07) The Impact of Culture in Teaching and Learning of English as a ...
**Dr. B. S. Kavhar, Shendurjana Adhao** ||35

08) Importance of Drama in Education: A Study
**Dr.Chandrashekhar Kanase, Beed** ||39

09) Hindu-Muslim Mysticism In Medieval India In A Common Ground For ...
**Dr. Ms. Mubaraque Quraishi, Tumsar** ||45

10) Changing Dimensions of Intellectual Property Rights (IPR)
**Dr. Pramod Pandharinath Waghmare, Beed** ||49

11) An overview of Intellectual Property Rights (IPR)
**Dr. Rajesh M. Deshmukh, Amravati** ||53

12) Nutritional Needs for Competitive Swimmers
**Dr. Kamini Mamarde, Buldana** ||55

13) Growth and Development of Physical Education in India since Independence
**Dr. Manoj Vyavhare, Buldana** ||60

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm
College, MALKAPUR.
Buldana.

14) Role Of Various Soft Skills For Knowledge Management In Library Profession
**R. G. Baheti, Dr. V. P. Ubhale, M.S.** ||65

15) Significant Role Of Badminton In Human Life
**Prof. Dr. Seema V. Deshmukh, Buldhana** ||67

16) The Subaltern: An Overview
**Dr. B. W. Somatkar, Buldana** ||70

17) Sports Education And Sports Culture
**Ulhas V. Bramhe, Buldana** ||73

18) Automation of News Paper Clipping Service using WINISIS : a complete solution
**Dr. Sachin G. Mahajan, Amravati** ||77

19) Non Performing Asset In Indian Banking System And Its Adverse Effects
**Prof. Dr. Balkrishna N. Mahajan, Amravati** ||81

20) Slow Down In Economy : Rural Development As Solution
**Dr.Palvinder Kaur Bakshi, Delhi** ||86

21) Role of Music In Human Life
**Prof. Dr Archana M Ambhore, Akola** ||92

22) थोर समाजसुधारक महात्मा फुले यांचे धार्मिक प्रबोधनात्मक विचार
**प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के, अमरावती** ||95

23) इंग्रजांच्या आर्थिक धोरणांचा भारतावरील परिणाम
**प्रा.डॉ. नंदकिशोर ल. अरुळकर, बुलडाणा** ||97

24) मध्ययुगीन काळ आणि संतसाहित्यातील मानवतावाद
**डॉ.गजानन भाऊराव मुंधे, शेंदुरजना (अढाव)** ||99

25) मानवी जीवनात संगीताची भूमिका
**प्रा.डॉ. जयश्री विश्राम कुळकर्णी, परतवाडा** ||102

26) वजन नियंत्रणासाठी योग्य पध्दतीचा वापर
**प्रा. सतिश आनंदराव काळे, वाशिम** ||104

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.

27) ब्रिटिश प्रशासनाचा भारतावर झालेला आर्थिक प्रभाव (इ.स.१९२० ते १९४७)
**प्रा.डॉ. अमोल बोरकर, वाशिम** ||105

28) महिला आणि मानवी हक्क
**डॉ. दिपक आनंदराव चौरपगार, अकोला** ||107

29) ज्ञानव्यवस्थापन : आवश्यकता आणि साधने
**प्रा. संदीप अंबादास लांडे, खामगाव** ||109

30) विसाव्या शतकात ब्रिटिश सरकारचे शेतीविषयक धोरण आणी त्याचा प्रभाव व शेतीची स्थीती
**प्रा.डॉ. एस. एस. इंगोले, वाशिम** ||112

31) राजकारणामुळे संसदेच्या श्रेष्ठत्वाचा ऱ्हास
**प्रा.डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड, अकोला** ||114

32) वारकरी संप्रदायाचे आधारस्तंभ : संत एकनाथ
**प्रा. डॉ. अनिता देशमुख, वर्धा** ||117

33) विमुद्रीकरण धोरणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव
**प्रा.डॉ. एस. यु. धामने, वाशिम** ||122

34) भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर ब्रिटीशांच्या राजवटीचा पडलेला प्रभाव
**प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर, यवतमाळ** ||124

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार
**परमेश्वर शेषराव सुर्वे, बुलढाणा** ||128

36) १९ व्या शतकातील समाजकार्यात क्रांतीबा व सावित्रीची मानवता
**डॉ. आर. पी. झनके, बुलडाणा** ||130

37) जागतकीरणाचा भारतीय संरचणेवरील प्रभाव
**डॉ. दयानंद उत्तमराव राऊत, बुलडाणा** ||134

38) उपेक्षित समाजातील महान संत चोखामेळा
**प्रा. दीपक महाजन, वर्धा** ||136

39) क्रांतिज्याती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य
**प्रा. डॉ. एस. एन. तुरूकमाने, बुलढाणा** ||140



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

40) भारतीय राज्यघटना व महिलांचे हक्क
प्रा. प्रमोद वानखेडे, हिंगणघाट ||142

41) विसाव्या शतकातील राजकीय विचार (२०th Century Political thoughts)
महादेव उकर्डा सातव, बुलडाणा ||145

42) मानवी जीवनात संगीताची भूमिका
प्रा. विद्या प्र. गावंडे, मूर्तीजापूर ||149

43) ब्रिटीश कालीन भारतावर ब्रिटीशांच्या धोरणाचा आर्थिक प्रभाव
प्रा. वाय. एस. राजपूत, बुलडाणा ||151

44) वृध्दत्व
प्रा. वनिता किसनराव बादडे, बुलडाणा ||153

45) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारातील कालातितता
प्रा. पुरूषोत्तम एस. निर्मळ, अकोला ||156

46) मानवी जीवनामध्ये संगीताची भुमिका
प्रा. शिवदास वि. शिंदे, नांदेड ||159

47) राजर्षी शाहु यांचे शैक्षणिक सुधारणा कार्य
डॉ. संदीप मनोहरराव राऊत, मोर्शी ||161

48) १९ व्या शतकातील धार्मिक व सामाजिक क्रांती कारक - स्वामी विवेकानंद
प्रा. डॉ. चंदा सुरेश जगताप, जि. अम. ||164

49) संत साहित्य
प्रा. अनिल शिवाजी आराक, मलकापूर ||167

50) मानवाधिकाराच्या संदर्भात असलेल्या सामाजिक जाणीव जागृतीच्या स्थितीचे समाजशास्त्रीय ...
डॉ. देवानंद मोहोड, अमरावती ||173

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication
February 2020
Special Issue-02
0167

49

# संत साहित्य

प्रा. अनिल शिवाजी आराक
मराठी विभाग प्रमख,
श्रीमती के. के. अगवाल महा., मलकापूर

***********

मराठी संस्कृतीच्या रथाचा आस म्हणजेच संत साहित्य होय. संत साहित्य हा सर्व साहित्याचा पाया आहे.

संत साहित्य म्हणजे आत्माचा अविष्कार आहे. संत साहित्य जगण्यातल्या मुलभुत प्रश्नांची उत्तरे शोधण्यास आजही मदत करते. संत साहित्य चिरंतन टिकणारे सत्य आहे. त्याला काळाचे बधंन नाही. आजही संतानी शिकवलेला मानवतावादी दृष्टीकोन लागु होतो. मानसाने माणूस म्हणुन माणसासोबत वागण्यासाठी संताचे विचार आत्मसात करणे आगत्याचे झाले आहे समाजाची विस्कटत चाललेली घडी पुन्हा रूळावर आणायची असेल तर संत साहित्य वाचून ते विचार आचरणात आणावे लागतील. उद्दीष्टे :—

१. संत साहित्याचा अभ्यास करणे.
२. संत साहित्याचे स्वरूप समजून घेणे.
३. संत साहित्याचा प्रसार प्रचार करणे.

**संत साहित्य**

**१. संत ज्ञानेश्वर:—**

संत बहिणाबाई यांनी संत ज्ञानेश्वरांच्या यथोचित असा गौरव कलो आहे.

ज्ञान देवे रचिला पाया। उभारियला देवालया।।

ज्ञानेश्वरांची साहित्य निर्मिती बहुविध स्वरूपाची हाती.

ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे, धार्मिक पब्रोधनाचे आद्यप्रणेते हाते. यादवकालीन समाजस्थितीचे आणि मराठी भाषेचे वैभव ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातून प्रतिबिंबीत झालेले दिसुन यते. तेराव्या शतकापासून ज्ञानदेवांची अमृतवाणी मराठी मनाला रिझवत आली आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहलेली भगवतगीतेवरील टिकाग्रंथ आहे. जनसामान्यांना वेदातील तत्वज्ञान समजावे आणि कळावे या दृष्टीने ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची रचना केली. मराठी भाषेचा सार्थ अभिमान ज्ञानेश्वर महाराजांना असलेला दिसून येतो.

'माझा मराठीचा बोलु कौतिके।
परि अमृतातेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके मळे विन।।

डॉ. रा. द. रानडे म्हणतात उपमा भाषासौंदर्य, तत्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती आणि अव्दैत यांची सांगड अलौकिक निरीक्षणशक्ती अप्रतिम कवित्वशैली अलोट वाङ्मय—माधुर्य या सर्व गुणामुळे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ न भूतो न भविष्यती असा झाला आहे.

ज्ञानेश्वरीनंतर त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचा अविष्कार अमृतानुभव या ग्रंथाच्या रूपाने व्यक्त केला. या ग्रंथातून ज्ञानेश्वरांनी चिद्विलासाचा सिध्दांत सांगीतला शुध्द आणि स्वतंत्र तत्वज्ञान या ग्रंथात पक्ट झालेले असल्यामुळे यामध्ये कल्पनाविलासाचे प्रसंग कमी आहेत हा ग्रंथ परमार्थिकासाठी लिहला आहे.

यानंतर ज्ञानेश्वरांनी 'चांगदेवपासष्टी' ची रचना केली! चागं देवाने ज्ञानेश्वरांची किर्ती ऐकून त्यांना एक पत्र पाठविले. परंतू ज्ञानेश्वर हे अनुभवाने आणि अधिकाराने मोठे पण वयाने मात्र लहान होते. अशा ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा कि आर्शीवाद या पेचात चांगदेव पडले म्हणून त्यांना ज्ञानेश्वरांनी जे पत्र लिहले ते चांगदेव पासष्टी होय.

या पत्रातुन ज्ञानेश्वरांनी चागं देवांना उपदेश केला आहे.

ज्ञानेश्वरांनी अभंगरचना सुध्दा विपूल प्रमाणात केलेली दिसून यते. या अभंगरचना निर्मीती मागील हेतु हा की जीवन दृष्टी आणि तत्वज्ञान सर्वसामान्य लोकापर्यंत पोहोचविणे पंढरपूरचे मोठेपण, विठ्ठल नामाचे माहात्म्य त्यांच्या अनके अभंगातून वर्णन झालेले आहे.

**२. संत नामदेव :—**

नामा तयाचा किकं श, त्याने कले ा विस्तार नामदेव महाराज मराठीतील आद्य— पद्य चरित्रकार म्हणून ओळखले जातात. नामदेवांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र व त्यांच्या भावंडांची महत्वपूर्ण व अज्ञात माहिती उलगडून दाखविली. निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई,



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.

यांची समाधी चरित्रे, तसेच संत गोराकुंभार, जनाबाई, चोखामेळा यांची चरित्रे नामदेवांनी लिहली.

नाममाहात्म्य सांगणे व भक्तिमहती विशद करणे, हा नामदेवाचा आख्यान काव्यरचनेमागील हेतू होता. नामदेव महाराजांच्या भाबड्या मनाला अद्भूततेचे आकर्षण फार होते. याच भुमिकेतून नामदेवांनी दशावतार वर्णन, हरिश्चंद्राख्याने, ध्रुवाख्यान, अशी सरस आख्यानेही लिहली आहेत.

नाचु किर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी।।

अशी नामदेवांची धारणा होती व ती त्यांनी आपल्या वैविध्यपुर्ण अभंगरचनेने परिपुर्ण केली आहे.

भक्त भागवत बहुसाल ऐकिले।
बहु होउन गेली होती पुढे
परि नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्वा हा रस
अद्भूत निरूपम।।

असे ज्ञानदेवांनी त्यांच्या विषयी उद्गार काढलेले आहे. ज्ञानदेव व नामदेव यांच्या मैत्रीची मुलायम पोत नामदेवांच्या अभंगातून व्यक्त होते. नामदेवांनी विपूल काव्यरचना केलेली असुन अनेक विषय त्यांच्या अभंगात आलेले आहेत.

'नामयाची वाणी अमृताची खाणी' अशी भावना सर्व संतमडं-ळात दिसुन येते. नामदेवांच्या आरत्या आजही घराघरातून म्हटल्या जातात.

घालीन लोटांगण वदं ीन चरण।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे।।

नामदेव हे पहिले कीर्तनकार असुन त्यांनी वारकरी कीर्तनाची एक स्वतंत्र धाटणी सांगीतलेली आहे. भक्तीच्या उमाळ्यातून त्यांच्या रचना निर्माण झाल्या. भावकोमल तरल, भावरंग आणि उग्रसुंदर भावक्षोभ यांचे नाट्य नामदेवाच्या काव्यातुन प्रतिबिंबित होते. नामदेवगाथा म्हणजे अमृत—वाणीचे सरोसर आहे. एका अगभूत गये तेने अणि पद लालित्याने नटलेल नामदेवांची कविता आहे.

३. जनाबाई:—

संत जनाबाई एक बडं खोर कवयित्री म्हणुन ओळखली जाते. तिचे वर्णन संतवाटिकेते ील जाईची वले अशी करतात. जनाबाईचे अभंग सुदं र भावगीते आहेत. ती स्वत:चा उल्लेख 'नामयाची दासी' असा करतांना दिसून येते. स्त्रीमनाचा हळूवारपणा आणि भक्तीची उत्कटता त्यांच्या सर्व अभंगामध्ये ओथबंलेली दिसते.

नाम फुकट चोखट। नाम होता नये वीट।।
जड शिळा ज्या सागरी। आत्मारामे नाम ताही।।
असे नामाचे माहात्म्य तिने सांगितले आहे.
तु माझे माहेर। काय पाहसी अंतर।।
ओवाळुनी पाया। जीवेभावे पंढरीराया।।

या त्यांच्या उद्गारातील कणव आणि आर्तता मनाला स्पर्श करे याशिवाय राहत नाही. कधी त्या विठ्ठलाला चिडवतात

अरे विठ्या अरे विठ्या।
मूळ मायेच्या कारट्या।।

जनाबाईंनी कृष्णजन्म बालक्रीडा व काल्याचेही अभंग लिहले आहेत ज्ञानदेवाच्या स्तुतिपर अभंगात त्या म्हणतात.

ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।
मरोनिया जावे। बा तुझ्या पोटा यावे।।

या शब्दात ज्ञानदेवाबद्दलचा आदर त्या व्यक्त करतात. जनाबाईंनी सेना न्हावी व नामदेव यांच्यावरही चरित्रपर अभंग लिहले आहेत नामदेवांच्या चरित्रात त्यांच्या असामान्य विठ्ठल भक्तीचे व विठ्ठलाच्या नामदेवावरील प्रेमाचे काही प्रसंग आले आहेत. त्यांनी थालीपाक, तीर्थावली, पाळणा दशावतार—वर्णन यासारख्या रचना केल्या आहेत त्यांच्या अभंगातुन पुराणाचे संदर्भ भरपुर येतात.

जनाबाई या मुळातच जातिवंत कवयित्री हात्या जेष्ठ अभ्यासक रा.चि. देरे हे जनाबाईच्या काव्याचे रसगह्र ण करतांना म्हणतात. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपान, संत गोरा कुंभार, संत चोखमेळा, संत सेना महाराज आदि सत्पुरूषांच्या जीवनाचा, सद्गुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करून संत जनाबाईनी पुढील पिढ्यांवर

एकप्रकारे उपकारच करून ठेवले आहे.

जनाबाईची भाषा सर्वसामान्य माणसाच्या हृदयाला जाउन भिडते.

४. चोखामेळा :—

चोखोबा त्याचे कुटुंब हे सर्व प्रपंचाचे काबाडकष्ट उपसत असतांनाच नित्यनेमाने व शक्तिभावाने पांडुरंगाचे



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm
College, MALKAPUR.

नामस्मरण व सगुणसंकीर्तन करीत होते. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले. दैन्य, दारिद्रय वफैल्य यामुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. त्यांना संतसंग लाभला ते म्हणतात

वाणी नाही शुध्दधड न ये वचन।
धि:क्कारती जन सर्व मज।।
अंगसंग कोणी जवळ न बैसे।
चोखा म्हणे ऐसे जीवित माझे।।

असे समाजाने केलेल्या आपल्या उपेक्षचे दु:ख त्यांनी अंभगातून मांडले आहे. त्यांच्या अभंगातुन दलितांवर झालेल्या सामाजिक अन्यायाची बोच व्यक्त होते चोखोबा जेव्हा अध्यात्मिक उंचीवर जातात तेव्हा ते म्हणतात

कोण तो सोहळा कोण ओवळा।
दोन्हीच्या वगे ळा विठू माझा।।

विठ्ठल दर्शनाची तळमळ त्यांच्या बऱ्याच अभंगातुन स्पष्ट झाली आहे. त्यांचे या प्रकारचे अभंग उत्कृष्ट भावकवितेच्या तोडीचे आहेत.

धाव घाली विठु आता।
चालु नको मदं।।

त्यांच्या काव्यनिर्मितीची प्रेरे णा जशी आध्यात्मिक आहे. तशी सामाजिकही आहे. संताच्या अभंगवाणीतील अनुभवाची कक्षा चाखे ोबाच्या कवितेने रुंदावली चोखोबांच्या नावावर 'विवेकदर्पण' हे प्रकरण सापडते. सकलसंतगाथामध्ये त्यांच्या नावावर ३४९ अभंगाची नोदं झालेली दिसते.

उस डोंगा परि रस नव्हे डोंगा
काय भुललासी वरलीया रंगा।।

अशा परखड शब्दातुन त्यांनी मानवतेची जाणीव निर्माण करून दिली. त्यांचे अभंग वारकरी पंथात फार लोकपिय्र आहेत.

**५. गोरा कुंभार :—**

ज्ञानदेव, नामदेवाच्या भोवती असलेल्या प्रभावळीत गोरोबा काकाचे स्थान फार वरचे आहे. नामदेव महाराज त्यांच्या विषयी गौरवोद्‌गार काढतांना म्हाणतात.

गोरा जुनाट पैजुना। हाती थापटणे अनुभवाचे।।

मडकी घडवितांना त्यांचे सतत नामस्करण चालत असे.

मुकिया साखर चाखाय दिधली।
बोलता हे बोली बोलवेना।
म्हणे गोरा कुंभार विठ्ठल मंत्र सोपा।
एक वेळा बापा उच्चारी रे।।

असा नामाचा महिमा त्यांनी आपल्या अभंगातुन सांगीतला आहे. उच्चपारमार्थिक अनुभवाच्या आनंदासोबतच ईश्वराशिवाय जन्म व्यर्थ जात असल्यामुळे पश्चातापदग्धतेचेही पन्न ाह गोरोबाच्या अभंगातून दिसून येतात.

जन्मा यडे निया काय केली करणी।
व्यर्थ शिणवली जननी।।
नउ महिने ओझे वागवून।
नही गेला तिचा शीण
ऐसाझालो अपराधी
क्षमा करा कृपानिधी।।

अशा अपराधीपणाचे भाव सुध्दा त्यांच्या अभगातून व्यक्त झालेले दिसुन येतात. पढु च्या अभंगामध्ये ते विठ्ठलाला विनवणी करतात की त्यांची कृपा सदैव गोरोबाच्या पाठिवर असु दे

देवा तुझा मी कुंभार। नासी पापाचे डोंगर।।
ऐशा संतप्त हो जाती। घडे सांधुची संगती।।
म्हणे कृपा भगवंताची। गोरा कुंभार मागे हेचि।।

हा त्यांचा अभंग अतिशय वैशीष्ट्यपूर्ण असा आहे गोरोबांच्या अत्यतं साध्या अशा अभंगरचनते संपन्न आणि सात्वीक असा ज्ञानानुभव साठविला आहे.

**६. संत तुकाराम:—**

तुकाराम महाराज यांच्या कार्याचा गौरव करतांना संत बहिणाबाई म्हणतात.

"तूका झालासे कळस
भजन करा सावकाश"

तुकाराम महाराज हे एक अद्‌भूत आणि एकमवे वैशिष्टयपुर्ण संत आहते. त्यांनी लोकभाशेचा स्वीकार करून विठ्ठलभक्तीचा प्रसार आणि प्रचार केलेला दिसतो. भक्तीबरोबर त्यांनी कर्माचा पुरस्कार केला. आध्यात्मिकता जपतांना आपली कर्मप्रवृत्ती कशी असावी हेही नमदु केले. तुकाराम महाराजांच्या काळात समाजस्थिती ठीक नव्हती. ती त्यांनी चव्हाट्यावर आणली त्यांची गाथा म्हणजे त्या समाजस्थितीचा आरसा असे म्हटले जाते समाजात वाढलेला अनाचार, अत्याचार,



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm. College, MALKAPUR

भ्रष्टाचार आणि वामाचार या साऱ्या व्याभिचारांच्या बाजूवर प्रखर प्रकाश टाकनू त्यांनी दांभिकांवर कोरडे ओढले आहेत.

तुकाराम महाराजांच्या जीवनात संघर्षाचे अनेक प्रसंग आले. त्याचे प्रतिब्रिंब तुकोबाच्या अभंगवाणीत दिसुन येते. तुकारामांच्या लौकिक आणि पारलौकिक जीवनाचे प्रतिध्वनी त्यांच्या कवितेत उमटले आहेत. त्यांची काव्यगंगा त्यांच्या जीवनासोबत वाहिली आहे. तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील अखेरचे प्रमुख वारकरी संत त्यांची कविता म्हणजे संत साहित्याचा कळसाध्यायच म्हटले पाहिजे.

आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने।
शब्दाचीच शस्त्रे यत्ने करू।
शब्दाचि आमुच्या जीवाचे जीवन।
शब्दे वाटु धनजन लोका।।

शब्दालाच त्यांनी देव मानले आहे. तुकाराम महाराजांच्या विचारांचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यासं सामाजिक अधिष्ठान लाभले होते. त्यांनी पढीक पंडीत, ढोंगी, साधु, लोभी, शिक्षेकरी इत्यादी सर्वांचा आपल्या वाङ्मयातुन कडक समाचार घेतला आहे. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश हा या झगड्याचाच परिपाक आहे. जातपात व उच्चनीच भेदभाव या गोष्टींना त्यांनी पोटतिकडीने विरोध केला.

दया करणे जे पुत्रासी।
तेची दासा आणि दासी।।

अशी व्यापक मानवतावादी भूमिकेचा त्यांनी पुरस्कार केला. तुका म्हणे देही। संत जाहले विदेही।।

देही राहून विदेही होण्याची किमया त्यांनी साधली होती.

म्हणुनच अवघ्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या मनात तुकारामांना अत्यतं आदराचे स्थान फ्राप्त झाले होते.

**७. रामदास :—**

संतमालिकेत समाविष्ट होणारे परंतु स्वतंत्र असा सांप्रदाय निर्माण करणारे रामदास स्वामी हे सोळाव्या शतकातील आगळेवेगळे कवी होते. प्रयत्नवादी संत म्हणुन त्यांचा गौरव केला जातो. प्रपंच याचे आणि व्यवहार धर्माचे त्यांनी त्यांच्या साहित्यातुन जीतक्या सुक्ष्मतेने व साकल्याने विवरण केले आहे. तितके इतर कोणत्याही संतांनी केले नाही.

संत रामदास यांनी करूणाष्टके, रामायणे, मनाचे श्लोक, दासबोध, एकवीसमासी स्फ्रुट प्रकरणे, मानसपुजा असं विपूल साहित्य लिहलं आहे.

करूणाष्टके नावाप्रमाणेच कारूण्याने भरलेली दिसुन येतात. रामदास या करूणाष्टकांत अक्षरश: रडले आहेत. ते म्हणतात.

अनुदिन अनुतापे तापलो रामराया।
परमदीन ह्याळा नरसी मोहमाया
अचपळ मन माझे नावरे आवरिता
तुझविण शिण होता धावरे धाव आता।।

रामदासांच्या अंत:करणातील अनुताप, वैराग्य, कोमलता याचे चित्र करूणाष्टकांत दिसते.

रामदासांनी दासबोध व मनाचे श्लोक या त्यांच्या प्रमुख साहित्यकृतीतून माणसाने कसे वागावे व वेळेचे व्यवस्थापन कसे करावे हे अतिशय नेटकेपणाने सांगीतले आहे. रामदासांनी दासबोध ज्या काळात लिहला त्यावळेच्या मानवी जीवनाशी निगडित असा एकही विषय त्यांच्या निरूपणातून सुटलेला नाही. ते म्हणतात.

नका करू खटपट, पाहा माझा ग्रंथ नीट।
तेणे सायुज्याची वाट, ठाई पडे।।

वरिल काव्यओळीतून त्यांचा आत्मविश्वास दिसून येतो.

श्रवण हाये कार्यसिध्दी। श्रवण लागे समाधी।
श्रवण घडे सर्व सिध्दी। साधनांची।।

संत रामदासांनी भक्ती, कुटुबं, समाज, आणि राष्ट्र यावर सर्वांगीण विवेचण केले आहे. समर्थ रामदास जसे संत होते तसे उत्तम संघटक होते. तसेच मानवतावादाचे पुरस्कर्ते होते.

कर्मपूजा हीच खरी ईश्वरपुजा आहे. प्रयत्नांनीच माणसाला सर्व काही प्राप्त होते त्यासाठी त्याने सतत सत्कर्म केले पाहिजे.

**८. संत बहिणाबाई**

तुकाराम महाराज यांची सुप्रसिध्द शिष्या म्हणून ओळख. भागवत संप्रदायाचा इतिहास बहिणाबाईंनी एका अभंगात चित्रीत केला आहे.

संतकृपा झाली। इमारत फळा आली।।
ज्ञानदेव रचिला पाया। उभारिले देवालिया।



Verified & Found Correct
Incharge Principal
Smt. K. K. Agrawal Arts-Comm. College, MALKAPUR.

नामा तयाचा किंकर। तेणे केला विस्तार।।
जनार्दन एकनाथ। ध्वज दिला भागवत।।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।

आजही सर्व वारकऱ्यांच्या तोंडी हा अभंग दिसून येतो. हे बहिणाबाईचे सर्वात मोठे यश आहे. संत बहिणाबाईंनी संत तुकारामांची प्रेरणा घेवून आपले भावविश्व फुलवले आहे. आपले गुरू तुकाराम महाराज त्यांची गुरू परंपरा ही

त्यांनी एका अभंगातुन सांगीतली आहे.
एकनिष्ट भाव तुकोबाचरणी।
म्हणोनी बहीणी लाधलीसे।।
बहिणी म्हणे तुका सद्गुरू सदाहर।
भेटला अपार सुख होय।।

असा भक्तिभाव त्यांच्या अनेक अभंगातुन व्यक्त होतो. अत्यतं प्रासादिक, साध्या व स्त्रीसुलभ भाषेतुन रेखाटलेले भक्तीभावनेचे चित्र म्हणजे बहिणाबाईचे अभंग आहेत. तूकोबाच्या दर्शनामुळे मनाची झाालेली वर्णनातीत अवस्था बहिणाबाईंनी पुढील अभंगातुन माडली आहे.

बहिणी म्हणजे जैसा लोटला समुद्र।
हृदयासी चंद्र बोले वाचा ।।

समरसता आणि तटस्थता यांच्या प्रयागतिर्थात न्हालेली ही कथा, बहिणाबाईच्या सहानुभावामुळे व्यापक बनल्याची जाणीव रा.चि. ढेरे यांनी व्यक्त करून दिले आहे.पढं रीस पांडुरंगाचे दर्शन घेतांना बहिणाबाई लिहीतात

पांडुरंगमुर्तीत देखोनी पवित्र।
संतोषीले नेत्र ईंद्रीयेसी।
वाटे मनामाजी राहावे येथेची।
परि प्राप्तनाची दशा नाहि।।

अशी आनंद आणि व्यथा यांनी संमिश्र त्यांची अवस्था होते. तुकोबाच्या दर्शनासाठी हेलावणारे त्यांचे अंतरंग आणि प्रत्यक्ष तुकोबाचा साक्षात्कार झाल्यावर आनंद हा चित्ता सामवेना अशी सुखावस्था ही सारी भावस्पदं ने त्यांच्या आत्मचरित्रात्मक अभंगांनी हळूवारपणे टिपली आहेत.

**९. संत एकनाथ**

संत एकनाथाची लोकशिक्षक किंवा लोकसाहित्यकार अशीही ओळख आहे. एकनाथांचा भारूडकार म्हणून गौरव केला जातो. संत एकनाथानी, चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रूख्मिणी स्वयंवर, अशी दीर्घकाव्य लिहली. भावार्थ रामायणात ते काव्यनिर्मितीचे प्रयोजन स्पष्ट करतात.

ज्ञानी निवती परमार्थबोधे।
पंडीत निवती पदबधे।
लोक निवती कथा विनोदे।
ग्रंथ संबधे जग निवे।।

चतु:श्लोकी भागवत हा नाथाचा पहिला ग्रंथ. चतु:श्लोकी भागवतात विश्वोत्पत्तीसारखा अवघड विषय अत्यतं सोपा करून नाथांनी मांडलेला आहे.

''पावोनी चतु:श्लोकी ज्ञाना।
ब्रम्ह झाला ज्ञानसंपन्न।
करिता सृष्टीचे सर्जन।
तिळभरी अभिजान बाधीना।
त्या ज्ञानाची रसाळ कथा।
मऱ्हाठिया सांगेन आता।।''

मराठीत चतु:श्लोकीचा भावार्थ विशद करून त्यांनी मराठी घोंगडी संतालगी केली असे म्हटले आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी गीतेवर टिका केली आणि नाथांनी एकादश स्कंधावर टीका केली. एकादशस्कंधात कृष्ण—उध्दव यांचा संवाद आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ या दोघांची विचारसरणी, उपमा, रूपकादी अलंकाराची धाटणी, भाषापध्दती, शब्दरचना, आणि वाक्यरचना बऱ्याच अंशी एक आहे.

माझी मराठी भाषा चोखडी।
परब्रम्हे कळली मोठी।

असे त्यांनी भागवतात म्हटले आहे. रूख्मिणी स्वयंवर हे साहित्यगुणांनी आकृष्ट करून घेणारे आख्यान काव्य आहे. श्रीकृष्ण रूख्मिणीच्या विवाहाचे सुंदर वर्णन यामध्ये आहे.

ये ग्रंथीचे निरोपण। चिवा होतसे लग्न।
अर्थ पाहता सावधान। समाधान सात्विक।।

एकनाथांनी भारूडे, गौळणी, विराण्या, आरत्या, अशी विपूल साहित्य निर्मिती केली आहे.

त्यांच्या भारूडाचा अभ्यास नाथकालीन समाजाचे अंतरंग दर्शन घेण्यास अत्यंत उपयुक्त ठरणारा आहे. त्यामध्ये तत्कालीन ग्रमजीवन, कृषिप्रधानता, माजोरी शासक वर्ग, दैवावर विसंबुन राहण्याची प्रवृत्ती असे



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.

विषय दिसून यते ात. एकनाथाच्या भारूडाला सामाजिक दृष्ट्या महत्व आहे. सण, उत्सव, पत्र लित खेळ यांचे दर्शन सुध्दा त्यांनी भारूडातून घडविले आहे.

**१०. सावता माळी**

हरिस्मरणात स्वत: पणु पिणे हरवनू बसणारा हा संत त्यांना विठ्ठल दर्शन त्यांच्या व्यवसायातूनच घडुन आले. यामळुे त्यांचे सारे जीवन विठ्ठलमय बनले. सावता सागर, प्रमे ाचा आगर असे नामदेवांनी त्यांचे वर्णन केले आहे.

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।।
लसुण मिरची कोथिंबीरी।
अवघा झाला माझा हरी।

या अभंगातुन त्यांचा सारा व्यवसाय विठ्ठलमय झाल्याचे दिसते. आपल्या जातविषयी समाधान व्यक्त करतांना ते म्हणतात

''आमुची माळ्याची जात।
शेत लावू बागाईत।''

संत सहवासाची अपेक्षा करतांना ते म्हणतात.
आठवावे संतासी हेचि खरे।
पूर्ण भक्त आम्हा ते भक्ती दाविती।

घडावी संगत तयाशीच अत्यंत साधी प्रेमळ वाणी व उत्कट भावनावगे ही त्यांच्या अभंगाची वैशिष्ट्ये आहेत.

**११. मुक्ताबाई**

निवृत्तीनाथ ज्ञानदेवापेक्षा वयाने लहाने असलेली पण संत मंडळात मोठे स्थान व अधिकार असलेली कवयित्री आहे. इतर संताच्या सहवासात असतांना त्यांनी अभगरचना केली. पंढरी माहात्म्य नाममाहात्म्य व संतसमागम या विषयावर त्यांचे अभंग उपलब्ध आहेत.

मुंगी उडाली आकाशी। तिने गिळले सुर्याशी।
थोर नवलाव झाला। वांझे पुत्र प्रसवला

हा मुक्ताबाईचा अभंग कटु रचनेचे चांगले उदा. सांगता येईल. एकदा ज्ञानेश्वर महाराज निराश होतात. व ताटी लावनू बसतात त्यावेळी मुक्ताबाईन काही अभंग म्हटले आहे. हे अभंग ताटीचे अभंग म्हणुन प्रसिध्द आहेत.

मजवर दया करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।
संत जेणे व्हावे। जग बोलणे सोसावे।।
तरीच अंगी थोरपण। जया नाही अभिमान
थोरपण जेथे वसे। तेथे भूतदया असे।।

असा ज्ञानदेवांना उपदेश केला आहे. भावनेची कोवळीक ताटीच्या अभंगातून पदोपदी जाणवते.

**सारांश :—**

संत साहित्याचा अभ्यास करणे त्याचा भावार्थ समजावनू घेणे. अगदी महत्वाचे झाले आहे. तेराव्या शतकात श्री संत महाराजांनी आपल्या थोर ग्रंथातुन, अभंगातुन, विशुध्द आचरणातून समाजाला जो मार्ग दाखवला व पुढेही नामदेव, तुकोबा, संत एकनाथ, संत रामदास यांनी आपल्या वाड्मयातुन नि:संग, निष्काम जगण्यातुन तो मांडला. त्याचा विचार जर केला तर संत साहित्य समाजाला कर्मकांडातून मुक्त करून भावभक्तीच्या बळावर आत्मिक शांती समाधान मिळवनू देते.

सर्वच संतांनी सांगितले की व्यक्तिगत पातळीवर परमसुखाचे धनी कसे व्हावे. त्यांनी सामाजिक दोष दूर होण्यासाठी प्रमे भक्तीचा मार्ग दाखवला. या संतसाहित्यान` मानवाला खश मानवतावाद शिकवला. संत साहित्य माणसाला माणसावरच नव्हे तर निसर्गावर साऱ्या विश्वावर प्रमे करायला शिकवते.

एकविसाव्या शतकात खऱ्या अर्थाने संत साहित्याच्या अभ्यासाची आणि प्रेम, भूतदया, बंधुभाव, मानवतावाद अशा अनके सद्‌गुणांच्या जोपासनेची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा समाज नैतिकदृष्ट्या अधिकाधिक रसातळाला जाईल. मानसाला माणूस म्हणून घडविण्याचे सामर्थ्य संत साहित्यात आहे.

**संदर्भ ग्रंथ:—**

१. डॉ. दिलीप भीमराव गायकवाड, साहित्य दर्शन, प्रकाशन, पग्र ती — बुक्स प्र. लि. पूणे.
२. डॉ. व. दि. कुलकर्णी, संत सारस्वत, आकलन आणि आस्वाद.
३. संपादक : अशोक बेंडखळे, साहित्य त्रैमासिक, मै—जुलै २०१४ प्रकाशक: उज्वला मेहेंदळे, मुंबई.
४. http://mar.com. Wikipedia. Org> wiki
५. www.loksatta. Com
६. www.Maharashtra times. India times. Com

❑❑❑



Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. ... Comm.
College, ...KAPUR.

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
March 2021
Special Issue 261(B)

## Use of ICT in Teaching - Learning
### Opportunities and Challenges



**Guest Editor of the Issue :-**
Dr. P. D. Hudekar
Act. Principal
Vidarbha Mahavidyalaya, Buldana
Dist – Buldana [M.S.] INDIA

**Executive Editor of the Issue :-**
Prof. Sangita K. Pawar
Vidarbha Mahavidyalaya, Buldana

**Chief Editor :** Dr. Dhanraj T. Dhangar

**Co Editors of the Issue :-**
Prof. Vaibhao G. Vaghmare
Prof. M. T. Jamaiwar
Prof. S. H. Dandade
Prof. N. D. Raut
Prof. L. F. Shirale
Prof. S. V. Kalne
Shri. S. G. Pande

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Verified & Found Correct
Incharge Principal,
Smt. K. K. Agrawal Arts-Comm.
College, MALKAPUR.
Dist.Buldana.

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Role and Significance of ICT in Higher Education | Prof. Usha Awachat | 13 |
| 2 | ICT Integrated Teaching-learning Process in Rural Area : Opportunities and Challenges | Dr. Nilesh Sulbhewar | 25 |
| 3 | The Use of ICT in Political Science Teaching | Dr. Anant Awati | 29 |
| 4 | Significance of ICT in Education : Advancement in Teaching and Learning in Modern Era | Dr. Seema Deshmukh | 35 |
| 5 | Challenges of E-Governance in Rural India | Dr. S. Vijay Kumar | 41 |
| 6 | ICT and Learner-Centric Approach in Post-Pandemic Higher Education in India | Subodh Chinchole | 46 |
| 7 | Challenges in Higher Education in Rural India | Dr. Nandkishor Ugale | 51 |
| 8 | Role of Information and Communication Technology in the Field of Physical Education and Sports | Samit Saibya | 52 |
| 9 | Government Initiatives for Use of ICTS in Higher Education | Dr. T. P. More | 56 |
| 10 | Impact of Media on Teaching Learning Process | Dr. P. A. Jagtap | 61 |
| 11 | Online Education : Opportunities and Challenges | Prof. Ganesh Kadam | 63 |
| 12 | Use of Information Communication Technology (ICT) in Library | Dr. Sanjay Salwe | 73 |
| 13 | ICT in Sports and Physical Education | Dr. P. N. Ladhe | 76 |
| 14 | Efficiency of Teaching- Learning Practices Using ICT in the Wake of the Pandemic - With Special Reference to Management Education in Rural India | Dr. Anagha K | 79 |
| 15 | Use of ICT in Teaching-Learning : Opportunities and Challenges | Mr. Sunil Mali | 81 |
| 16 | Analytical Review of Global and Indian Policies on Use of ICT in Education as Pragmatic Approach | Dr. Kaveri Swami, Sangayya Gulledmath | 86 |
| 17 | The Role, Impact and Challenges of ICT on Higher Education | Dr. Manohar Kumbhare | 92 |
| 18 | Assistance of ICT to the Teaching and Learning of English Pronunciation | Gajanan Mane | 95 |
| 19 | Role of Information Technology in Physical Education and Sports | Tushar Jumde, Dr. D. R. Bhakt | 99 |
| 20 | Distribution of ICT Tools for Teaching in Science : Regional Study of Amravati District in Maharashtra | M. R. Yeotkar | 102 |
| 21 | ऑनलाइन अध्ययन काळाची गरज | उल्हास ब्रम्हे | 105 |
| 22 | अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत दृक - श्राव्य माध्यमांचा प्रभाव | डॉ. संजय गव्हाणे | 108 |
| 23 | विद्यार्थी केंद्रित शिक्षा पद्धती | डॉ. प्रमिला भुजाडे | 111 |
| 24 | शारीरिक शिक्षण व खेळात माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व | डॉ. अमोलसिंह गौतम | 116 |
| 25 | अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्रज्ञानाची उपुक्तता व महत्त्व | प्रा. अनिल आराक | 118 |
